केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नूसार जिल्हा परिषदेकडील वर्ग ३ व ४ संवर्गातील पदे सुनिश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४००००१
शासन परिपत्रक क्रमांकः क्र.दिव्यांग २०१९/ प्र.क्र.१४१ / आस्था-८,
दिनांक: १७ जुलै, २०१९.

वाचा :

१) केंद्र शासनाच्या विधी व न्याय विभागाची अधिसूचना दिनांक २८/१२/२०१६.
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र. अपंग २०१३/ प्र.क्र.३५/ अ.क.२, दिनांक ०७/१०/२०१६.
३) सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय क्र. अपंग २०१३/ प्र.क्र.२०१/ अ.क.२, दिनांक २०/०२/२०१९.
४) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/ प्र.क्र.११४/ १६ अ, दि.२९/०५/२०१९.
५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे पत्र क्र. अपंग २०१३/ प्र.क्र.३५/ अ.क.२, दिनांक ०५/०७/२०१९.

शासन परिपत्रक :

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने दि.२८/१२/२०१६ रोजीच्या अधिसूचनेव्दारे दिव्यांग व्यक्तीचे अधिकार अधिनियम, २०१६ अंमलात आणलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिव्यांग व्यक्तीसाठीचे महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण २०१८,ची अंमलबजावणी करणेबाबतचा शासन निर्णय दि.२०/०२/२०१९ रोजी निर्गमित केला आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाने दिव्यांग अधिनियम, २०१६ नूसार शासन सेवेतील पदांवर शारीरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी ४% आरक्षण विहीत करणे व आरक्षण अंमलबजावणीची कार्यपध्दतीबाबतचा शासन निर्णय दिनांक २९/०५/२०१९ रोजी निर्गमित केला आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने, अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे धर्तीवर राज्य शासनाच्या आस्थापनांवरील अपंगाकरीता सुनिश्चित केलेल्या पदांचे पुनर्विलोकन करणेबाबतचा शासन निर्णय क्रमांक अपंग २०१३/ प्र.क्र.३५/ अ.क.२, दि.०७/१०/२०१६ अन्वये निर्गमित केला असून, त्यामध्ये सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिका-याला सदरहू आदेशानूसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्याबाबत स्पष्ट केलेले आहे. त्यानूसार जिल्हा परिषदेकडील पदे सुनिश्चित करण्याबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाचा दिव्यांग अधिनियम, २०१६ व सामान्य प्रशासन विभागाचा दि.२९/०५/२०१९च्या शासन निर्णयानूसार जिल्हा परिषदेकडील पदे अपंगांसाठी सुनिश्चित करून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.०५/०७/२०१९च्या पत्रानूसार जिल्हा परिषदेकडील पदे अपंगांसाठी सुनिश्चित करून प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील तज्ञ समितीच्या मान्यतेसाठी सादर करावा लागणार आहे. यासाठी दिव्यांग अधिनियम, २०१६ नूसार जिल्हा परिषदेकडील पदे अपंगांसाठी सुनिश्चित करण्यासाठी पुढील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव व पदनाम	समितीवरील पद
१.	श्री. पी. बी. पाटील, उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.	अध्यक्ष
२.	श्री. एम. एस. घुले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, पुणे.	सदस्य सचिव
३.	श्री. शिरीष बनसोडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद.	सदस्य
४.	श्री. वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर.	सदस्य
५.	श्री. प्रदिप चौधरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक.	सदस्य
६.	श्री. डी. आर. माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, बीड.	सदस्य

सदर समितीने पुढील प्रपत्रानूसार आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार अहवाल शासनास आठ दिवसाच्या आत सादर करावा.

अक्र	पदनाम	शारिरीक पात्रता	अपंग प्रवर्ग	सदर पदाची जबाबदारी व कर्तव्ये	शेरा

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१७१३२५२०२०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Girish Dinkar Bhalerao
Date: 2019.07.17 16:39:54 +05'30'

गिरीश भालेराव
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०००01.
२. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व).
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
४. विभागीय उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व).
५. श्री. पी. बी. पाटील, उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.
६. श्री. एम. एस. घुले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, पुणे.
७. श्री. शिरीष बनसोडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद.
८. श्री. वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर.
९. श्री. प्रदिप चौधरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,जिल्हा परिषद, नाशिक.
१०. श्री. डी. आर. माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, बीड.
११. निवडनस्ती (आस्था ८).